ePaper

## करायचे तर एक नंबर नाही तर आपण त्याच्या नादाला लागत नाही- अजित पवार



| वर्ष - 7 | अंक - 286 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 3 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- विदर्भाला १७० धावांत गुंडाळले
- प्रियांकाने केली सिनेमाची घोषणा
- घराणेशाहीला निवडणुकीची भीती
- ...एकही निवडणूक हरले नाहीत

## तब्बल 45 कोटी रुपयांच्या ड्रग्ससह पोलीस उपनिरीक्षक गजाआड

# रक्षकच निघाले भक्षक!

### राज्यातील पोलीस दलात खळबळ : शहरात 'उडता पंजाब' सारखी परिस्थिती?

। पिंपरी । महाईन्यूज

**कुंपणच शेत आकत असल्याचा धक्कादायक प्रकार पिंपरी-चिंचवड येथे घडला.पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने केलेल्या कारवाईत पोलिसांनी एका 32 वर्षीय तरुणाकडून 45 कोटी रुपयांचे एम.डी. (मेफेड्रोन) हा अंमली पदार्थ जप्त केला आहे. या कारवाईमध्ये पिंपरी-चिंचवड पोलीसांचा एक कर्मचारीच यात सहभागी असल्याचे उघड झाले.**



नमामी शंकर झा (वय 32, मूळचा बिहार, सध्या रा. निगडी) असे एमडी सह अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे तर विकास शेळके असे अटक पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे.शेळके हा निगडी पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक या पदावर कार्यरत होता.\

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (दि.1) पहाटे अंमली पदार्थ विरोधी पथकाने कारवाईला सुरुवात केली. पिंपळे निलख येथे गस्त घालत असताना हातामध्ये पांढरी पिशवी घेवून एकजण संशयीतरित्. वावरत होता. पोलिसांना पाहताच तो घाईघाईत निघून जात होता.

पोलिसांनी पाठलाग करून त्याला ताब्यात घेत त्याची चौकशी केली. यावेळी त्याने त्याचे नाव नमामी शंकर झा असल्याचे सांगितले. त्याच्याकडून पोलिसांनी त्याच्याकडून 2 कोटी रुपये किमतीचे 2 किलो व 38 ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आले.

### आणखी एका कर्मचाऱ्यांचा सहभाग

निगडी पोलिस ठाण्यात तैनात असलेले पोलिस अधिकारी विकास शेळके यांना पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी कक्षाने ताब्यात घेतले आहे.वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कसून चौकशी केल्यानंतर मध्यरात्री शेळके याला अटक करण्यात आली, त्यानंतर त्याच्याकडून 44.50 किलो एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आले.असे या कारवाईत एकूण 44 कोटी 79 लाख 80 हजार रुपयांचे 44 किलो 790 रुपयांचे एमडीजप्त करण्यात आले. शेळके याला न्यालयीन कोठडीसाठी हजर करण्यात येणार आहे. पुण्यातील ड्रग्स रॅकेट प्रकरणा नंतर आता पिंपरी-चिंचवड येथे तर थेट पोलीस कर्चाऱ्याचाच सहभाग असल्याचे उघड झाल्याने ड्रग्सचे पुणे व आसपासच्या परिसरात पसरलेल्या जाळ्याची घट्ट पकड निदर्शनास येत आहे. ही कारवाई अमंली पदार्थ विरोधी पथकाचे वरीष्ट पोलीस निरीक्षक वैभव शिंगारे, सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत महाले, सचिन कदम, पोलीस हवालदार मोरे, पोलीस कॉन्स्टेबल कांबळे व इतर स्टाफ यांनी केली.

जसजसा तपास पुढे सरकत गेला तसतसा या प्रकरणात शेळके यांचा थेट सहभाग उघड झाल्याने मोठा खळबळ उडाली आहे.

---

## भोसरीच्या आखाड्यात मामा-भांजेंमध्ये 'मनोमिलन'!

### विलास लांडे म्हणतात : महेश लांडगेंना लोकसभा उमेदवारी द्या, माझी साथ!

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भोसरीत मी आणि महेश लांडगे एकत्र आलो, तर कुठेही अडचण येणार नाही. आम्ही एकतर्फी निवडणूक काढू, मला शिरूर लोकसभेची उमेदवारी देत नसाल तर आमदार महेश लांडगे यांना उमेदवारी द्यावी, असे माझे स्पष्ट मत आहे. त्यांचे काम करायला मी तयार आहे. हे माझे प्रामाणिक मत असल्याचे सांगत भोसरीचे माजी आमदार विलास लांडे यांनी अप्रत्यक्षपणे शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या उमेदवारीला विरोध दर्शविला आहे..**



शिवाजीराव आढळराव पाटील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये येण्याची चर्चा आहे. राष्ट्रवादीकडून ते शिरूर मधून निवडणूक लढवतील असे बोलले जात आहे. त्यावर लांडे म्हणाले की, त्यांचे स्वागत आहे. पण, आम्ही काही कमी नाहीत. आम्हाला थांबण्यास काय सांगणार, ते का याचे कारण सुद्धा समजले पाहिजे. मी लोकसभा लढविली आहे. चारवेळा विधानसभा निवडणूक लढविली आहे. महापौर होतो. त्यामुळे निवडणुकीचा मला अनुभव आहे. नवखा नाही, असेही माजी आमदार लांडे यांनी म्हटले आहे. भोसरीच्या राजकारणात माजी आमदार विलास लांडे यांचा २०१४ आणि २०१९ असे असे दोन

> 2019 मी लोकसभा निवडणूक लढविण्याची तयारी केली होती.पण, ऐनवेळी थांबावे लागले. यावेळी मी 100 टक्के निवडून येईल याची मला खात्री आहे. मी गेली 35 वर्ष राजकारणात आहे. मला मतदारसंघाची माहिती आहे. नातीगोती आहेत.भोसरीत साडेपाच लाख मतदार आहे. संपूर्ण शिरूरमध्ये नातीगोती आहेत. त्यामुळे काही अडचण नाही. निष्ठेला सुद्धा महत्व आहे. आमचा प्रामाणिकपणा अजित पवार यांच्यासोबत आहे.
> **-विलास लांडे,** माजी आमदार.

निवडणुकांमध्ये आमदार महेश लांडगे यांनी विजय मिळवला आहे. या दोन दिग्गज नेत्यांमध्ये मामा- भांजे असे नाते आहे. राजकीय सत्ता संघर्षामध्ये लांडे विरुद्ध लांडगे असाच सामना होता. मात्र, लांडे यांच्या बदललेल्या राजकीय समझोत्याच्या भूमिकेमुळे भोसरी विधानसभा मतदार संघामध्ये महेश लांडगे यांची ताकद प्रचंड वाढली असून, महायुतीत मामा-भांजे पैकी कुणाला महायुतीची उमेदवारी मिळणार? याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

# नोकरभरतीचा लाभ मराठा समाजालाही!

## » बारामतीत नमो महारोजगार मेळाव्याचे उद्घाटन

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**लोकाभिमुख असलेल्या महायुती सरकारने आतापर्यंत ७५ हजार युवकांना नोकरी दिली आहे. भविष्यात एक लाख ६० हजार युवकांना नोकरी दिली जाणार असून, नोकरभरतीचा लाभ आता मराठा समाजालाही होणार आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी बारामतीमध्ये दिली.**



तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे, असेही त्यांनी सांगितले. बारामती येथील विद्या प्रतिष्ठानाच्या कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या नमो महारोजगार मेळावाच्या उद्घाटन कार्यक्रमात एकनाथ शिंदे बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, खासदार सुप्रिया सुळे, सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा, सुनेत्रा पवार आणि आमदार दत्तात्रय भरणे या वेळी उपस्थित होते. बारामती पोलीस उपमुख्यालय आणि पोलिसांचे निवासस्थान या इमारतींचे व बारामती एसटी बसस्थानकाचे उद्घाटनही शिंदे यांच्या हस्ते झाले.शिंदे म्हणाले, की नमो महारोजगार मेळावा ही नोकरीसाठी सुवर्णसंधी आहे. राज्यामध्ये यापूर्वी नागपूर, लातूर, नगर या ठिकाणी रोजगार मेळावा घेण्यात आला. या महारोजगार मेळाव्याला प्रचंड प्रतिसाद मिळाल्यानंतरबारामती येथे रोजगार महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. फडणवीस म्हणाले, की पश्चिम महाराष्ट्रामध्ये नमो महारोजगार मेळावा घेण्यात आला. त्यामध्ये ५५ हजार पदे अधिसूचित करण्यात आली आहेत. यातून अनेक तरुणांना रोजगार उपलब्ध होणार आहे. अजित पवार म्हणाले, की उद्योजकांनी आपले उद्योग वाढवून नोकरीच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. भारताबाहेर अनेक देशांमध्ये नोकऱ्या उपलब्ध आहेत.जर्मनीमध्ये अनेक नोकऱ्या उपलब्ध असून, त्या संधीचे सोने करण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा. राज्यातील विकास कार्यामध्ये आता बारामतीचा पहिला क्रमांक लागेल, असा मला विश्वास वाटतो.रोजगारनिर्मितीकडे सरकारने लक्ष दिल्याने त्यांचे आभार मानतो. राजकारण बाजूला राहिले, पण मुख्यमंत्री आणि त्यांच्या सहकाऱ्यांना या मुद्द्यावर आमची साथ राहील, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिली. पवार म्हणाले, रोजगाराशी संबंधित हा कार्यक्रम आहे. राज्य सरकारला मी धन्यवाद देऊ इच्छितो, की आज रोजगार निर्माण करण्याची गरज आहे आणि राज्य सरकार ते काम करत आहे. राजकारण बाजूला राहिले. तरुणांना आधार देत आहेत, अशी भूमिका असेल, तर सर्वांनी सहकार्य केले पाहिजे. तीच भूमिका घेऊन मुख्यमंत्री आणि त्यांच्या सहकाऱ्यांना खात्री देतो, की तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी तुम्ही जे कराल त्यासाठी तुम्हाला साथ असेल. दरम्यान, शरद पवार व्यासपीठावर येताच मेळाव्याला उपस्थित तरुणांनी जल्लोष केला.नमो रोजगार मेळाव्यातून सुरुवातीला ४३ हजार नोकऱ्या मिळणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर ३० नोकऱ्या मिळणार असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यांपैकी अनेक पदे ही प्रशिक्षणार्थींची आहेत. त्यामुळे हा महारोजगार मेळावा नसून, महास्किल कार्यक्रम असल्याची टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकारांशी बोलताना केली.

### एसटी बसस्थानकाचे उद्घाटन

» तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे, असेही त्यांनी सांगितले.बारामती येथील विद्या प्रतिष्ठानाच्या कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या नमो महारोजगार मेळावाच्या उद्घाटन कार्यक्रमात एकनाथ शिंदे बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, खासदार सुप्रिया सुळे, सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा, सुनेत्रा पवार आणि आमदार दत्तात्रय भरणे या वेळी उपस्थित होते. बारामती एसटी बसस्थानकाचे उद्घाटनही शिंदे यांच्या हस्ते झाले.

---

# अण्णा भाऊ साठे यांना भारतरत्न जाहीर झालाच पाहिजे

## » मुख्यमंत्री शिंदे यांच भाषण सुरू होताच नागरिकांच्या घोषणा

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुण्यातील संगमवाडी पुलाजवळील जागेत आद्य क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मारकाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते भूमिपूजन झाले.**

या कार्यक्रमाला भाजपचे नेते मंत्री चंद्रकांत पाटील,आमदार माधुरी मिसाळ, सुनील कांबळे, भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, चेतन तुपे, सुनील टिंगरे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, क्रीडा आयुक्त डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे, मनपा अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, तसेच आजी माजी पदाधिकारी देखील उपस्थित होते.या कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे भाषण करण्यास उभे राहताच, सभा मंडपातील काही नागरिकांनी साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार जाहीर झालाच पाहिजे,अशा घोषणा देण्यास सुरुवात केली. त्यावेळी पोलिस आणि उपस्थित नेतेमंडळींची चांगलीच तारांबळ उडाल्याचे पाहण्यास मिळाले. घोषणा देणाऱ्या नागरिकांना पोलिसांनी शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र



तरी देखील घोषणा सुरूच होत्या, घोषणा देणाऱ्या नागरिकांचा पवित्रा लक्षात घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अण्णाभाऊ साठे यांचा विजय असो, असे म्हणताच घोषणा देणारे नागरिक शांत झाले. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच भाषण सुरू झाले आणि लहुजी वस्ताद साळवे यांचे स्मारक कसे असणार, याबाबत त्यांनी माहीती देखील दिली.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, क्रांतीगुरू लहुजी वस्ताद यांच्या आदर्शानुसार चालणारे सरकार असल्याने सर्वसामान्यांसाठी अनेक प्रकल्पांचे उद्घाटन आज करण्यात आले आहे. मातंग समाज प्रामाणिक आणि कष्टाळू आहे, दिलेला शब्द पाळणारा आहे. बार्टीच्या धर्तीवर अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्थेची (आर्टी) स्थापना करून सर्वसामान्य माणसाला न्याय देण्याचे कार्य केले आहे. त्यामुळे मातंग समाजातील मुलांना आता उच्च शिक्षण घेता येईल. स्पर्धेच्या युगात या समाजाला इतर समाजाच्या बरोबर विकासात सहभागी करून घेण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

### भिडेवाडा येथे फुले स्मारक

» यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, शासनाने नुकत्याच सादर केलेल्या अर्थसंकल्पात गड किल्ले, महापुरुषांच्या स्मारकासाठी तरतूद ठेवली आहे. नव्या पिढीला महापुरुषांच्या कार्य, बलिदानापासून प्रेरणा मिळावी यासाठी स्मारके उभारण्यात येत आहेत. भिडेवाडा येथे देखील सावित्रीबाई फुले यांचे स्मारक होत आहे. लहुजी वस्ताद यांच्या हातातील दांडपट्ट्याला शासनाने राज्य शस्त्राचा दर्जा दिला आहे. आद्य क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मारकाच्या माध्यमातून मातंग समाजातील नव्या पिढीला प्रेरणा मिळण्यासोबत उच्च पदावर जाता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# मावळातील महाविकास आघाडीची समन्वय समिती ठरणार 'किंगमेकर'!

## लोकसभा निवडणूक : संजोग वाघेरे यांच्या लढाईत महत्वाचा वाटा


। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी लोकसभा, विधानसभा आणि महापालिका निवडणुकीत सत्ताधारी महायुतीच्या विरोधात लढा उभारण्यासाठी विविध पक्ष, संघटनांनी एकत्र येत येऊन महाविकास आघाडी समन्वय समिती स्थापन केली आहे. ही समिती मावळ लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीसाठी महत्वाची भूमिका बजावणार आहेत. त्याचा फायदा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवाराला होणार आहे. याचाच अर्थ या मतदारसंघात संजोग वाघेरे यांना विजयाचा मार्ग सुखकर होणार असल्याची चर्चा आहे.**

शहर पातळीवर महाविकास आघाडी समन्वय समिती स्थापन करून महायुतीला थोपविण्याचे काम केले जाणार आहे. सत्ताधारी पक्षाच्या जनविरोधी धोरणांना विरोध करीत मागील तीन दशकांपासून पिंपरी-चिंचवडमध्ये जन आंदोलन उभारणाऱ्या मानव कांबळे यांना महाविकास आघाडी शहर पातळीवर समन्वय समितीचे प्रमुख करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सोमवारी (दि. १९ फेब्रुवारी) झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. शाहूनगर, चिंचवड येथे झालेल्या बैठकीला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस खासदार शरदचंद्र पवार पक्ष, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच संभाजी ब्रिगेड, सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, मारुती भापकर आदी या वेळी उपस्थित होते.

शिवसेना, राष्ट्रवादी, काँग्रेसचे प्रत्येकी चार जण, संभाजी ब्रिगेड आणि कम्युनिस्ट पक्षाचे प्रत्येकी एक सदस्याचा समावेश समन्वय समितीत करण्यात येणार आहे. त्याच बरोबर या समितीत सामाजिक संस्थांच्या काही सदस्यांनाही सामावून घेण्यात येणार आहे. महाविकास आघाडी समन्वय समिती शिरूर आणि मावळ मध्ये एकत्रित ताकद लावणार आहे. परिणामी महायुतीच्या उमेदवाराविरोधात नकारात्मक अजेंडा रुजविण्यात मदत होऊ शकते अशी चर्चा आहे. त्याचा फायदा संजोग वाघेरे यांना होईल अशी स्थिती आहे.

### भीतिमुक्त वातावरणासाठी लढा उभारणार...



उद्धव ठाकरे यांच्याविषयी राज्यात सहानुभूतीची लाट आहे. त्यांचे हिंदुत्व सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन जाणारे असल्याचे ते मांडत आहेत. त्यांच्या पक्षाची उमेदवारी मिळाल्यास संजोग वाघेरे यांना देखील सर्व स्तरातून पाठिंबा मिळण्याची शक्यता आहे. जातीयवादी पक्षांना विरोध करणे हा समन्वय समितीचा मुख्य उद्देश असेल असा सूर यावेळी आवळण्यात आला. बूथ पातळीवर काम करणे, सरकारच्या विरोधात जनमत तयार करणे, एकाधिकारशाही झुगारणे आदी कामे समिती करणार आहे. सध्या देशात, राज्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. धर्माधर्मात, जातीपातीत तेढ निर्माण करण्याचे काम काही शक्ती करत आहेत. ही परस्थिती बदलण्यासाठी भितीमुक्त वातावरण देण्यासाठी लढा उभारायचा आहे. त्यासाठी सज्ज व्हा असे आवाहन समितीने केले आहे.

---

# भोसरीत महिला दिनानिमित्त महिलांचा 'कीर्तन जागार'

## महाशिवरात्रीनिमित्त पिंपरी-चिंचवडमधील पहिलाच उपक्रम

। पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडमध्ये पहिल्यांदाच जागतिक महिला दिन आणि महाशिवरात्रीच्या निमित्ताने भोसरीत महिलांकडून महिलांसाठी महिला दिनानिमित्त महिला कीर्तनकारांकडून 'शिव-शक्ती'चा जागर होणार आहे. हा अध्यात्मिक सोहळ्याच्या आयोजनासाठी पूर्णत: महिला स्वयंसेवकांनी पुढाकार घेतला आहे.**




महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन आणि शिवांजली सखी मंच्या पुढाकाराने प्रतिर्षी जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रम घेतले जातात. यावर्षी महाशिवरात्री आणि महिला दिन एकाच दिवशी आल्याचा दुग्धशर्करा योग आहे. या निमित्ताने आयोजकांनी भव्य कीर्तन महोत्सव-२०२४ आयोजित केला आहे. भोसरीतील महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशनच्या मैदानावर शनिवार, दि. २ मार्च ते दि. ९ मार्च असे आठ दिवस हा भक्तीमय सोहळा रंगणार आहे. रोज सायंकाळी ५ ते ६ या वेळेत हरिपाठ आणि ७ ते ९ यावेळेत कीर्तन होणार आहे. बार्शी येथील ह.भ.प. शिवलीलाताई पाटील, बीड येथील ह.भ.प. परमेश्वरीताई परभणे, नाशिक येथील ह.भ.प. ज्ञानेश्वरीताई बागुल, भिवंडी येथील ह.भ.प. वनिताताई पाटील, ह.भ.प. शालिनीताई देशमुख-इंदोरीकर, खेड येथील ह.भ.प. सुप्रियाताई साठे-ठाकूर, सासवड येथील ह.भ.प. गीतांजलीताई झेंडे आणि बीड येथील ह.भ.प. सोनालीताई करपे कीर्तनसेवा करणार आहेत. बीड येथील अन्नपूर्णा माता मुलींची वारकरी शिक्षण संस्था कीर्तन साथ देणार आहे. तसेच, मृदुंगाचार्या ह.भ.प. यशोदाताई सोळुंके याही योगदान देणार आहेत.

> जागतिक महिला दिन आणि महाशिवरात्री म्हणजे "शिव आणि शक्ति" यांचा जागरच म्हणावा लागेल. स्त्रीशक्तीला वंदन करण्यासाठी आणि भगवान महादेवाची आराधना करण्याची संधी एकाच दिवशी उपलब्ध झाली. त्यामुळे केवळ महिला कीर्तनकारांच्या माध्यमातून आठ दिवस हा भक्तीमय सोहळा भोसरीमध्ये रंगणार आहे. कीर्तनकार आणि त्यांना साथ देणाऱ्या पथकामध्येही सर्व महिलाच आहेत. महिला दिनानिमित्त यातून स्त्री-शक्तीचा सन्मान करण्याचा संदेश देण्यात येत आहे.
>
> **-पूजा लांडगे,** अध्यक्षा, शिवांजली सखी मंच

माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे, महाराष्ट्र कुस्ती परिषदेचे सरचिटणीस बाळासाहेब लांडगे, भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे, तसेच, पठारे-लांडगे तालीम मंडळ, श्रीराम मित्र मंडळ, वैष्णव विचार कीर्तन महोत्सव संस्था, भोजेश्वर मित्र मंडळ, माळी-आळी मित्र मंडळ, संतश्रेष्ठ ज्ञानोबाराय-तुकोबाराय प्रतिष्ठान, नामस्मरण भजनी मंडळ, जय हनुमान मित्र मंडळ, आझाद मित्र मंडळ, श्री संत सावता माळी महाराज प्रतिष्ठान यांच्यासह समस्थ भोसरी आणि पंचक्रोशीतील भाविक-भक्त या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. s

# आघाड्यांचे शिल्पकार कोण?



## भूमिका

**मोदींचं नाव घेतल्याशिवाय भाजपच्या मंत्र्यांचा दिवस पूर्ण होत नाही. कोणतीही माहिती देण्याआधी आणि नंतर मंत्री मोदींचं नाव घेतात. कधी नुसतं नाव घेतात किंवा 'मोदी है तो मुमकिन है' अशी घोषणा देतात. मोदींचं मंत्र्यांच्या कामगिरीवर लक्ष असतं. दोन आठवड्यांपूर्वी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मोदींनी सर्व मंत्र्यांना पुढील शंभर दिवसांचा आराखडा द्यायला सांगितला होता.**

मोदींची आपल्या मंत्र्यांवर इतकी तीक्ष्ण नजर असेल तर त्यांना मोदींचं नाव घ्यावंच लागेल. केंद्रीय माहिती व तंत्रज्ञानमंत्री अश्विनी वैष्णव यांच्यावर मोदींची विशेष मर्जी असावी. राज्यसभेचे सदस्य असलेल्या सगळ्या मंत्र्यांना मोदींनी पुन्हा राज्यसभेची उमेदवारी नाकारली आहे. आता त्यांना लोकसभा निवडणुकीत उतरवलं जाणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या स्पर्धेतून वाचले ते फक्त वैष्णव! त्यांना ओदिशातून बिजू जनता दलाने राज्यसभेवर निवडून आणलं आहे.



इतकी कृपादृष्टी असेल तर वैष्णवांना म्हणावंच लागेल, मोदी है तो मुमकिन है... सेमीकंडक्टरच्या चिप्सनिर्मितीचा मोठा कारखाना गुजरातमध्ये उभा राहतोय. गुजरात हळूहळू सेमीकंडक्टरचा हब बनू लागला, तेही मोदींमुळंच शक्य झाल्यामुळं श्रेय त्यांना द्यावंच लागेल. म्हणून वैष्णव म्हणाले, मोदी है तो... मोदींना भाजपच्या सत्तेचेच नव्हे तर आघाड्यांचेही शिल्पकार मानलं जाऊ लागलंय. केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर 'इंटरनॅशनल बिग कॅट अलायन्स'च्या निर्मितीबद्दल सांगत होते. त्याबद्दल माहिती देण्याआधी ठाकूर यांना 'अलायन्स' शब्द आठवला. मग, आठवले मोदी. ठाकूर म्हणाले की, तुम्हाला माहीतच आहे की, मोदींना आघाड्यांचे शिल्पकार म्हणतात. खरंतर बिग कॅट अलायन्सचा आणि राजकीय पक्षांच्या आघाड्यांचा एकमेकांशी काहीही संबंध नाही पण, मोदींचा उल्लेख करण्यासाठी 'अलायन्स' शब्द वापरून यमक जुळण्याचा ठाकूर प्रयत्न करत होते. यमक जुळलं नाही हा भाग वेगळा, पण मोदी शब्द तर आला. ठाकूर यांची लोकसभेची उमेदवारी निश्चित झालेली आहे. हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेस पक्षातील अंतर्गत धुसफुस पाहता ठाकूर यांना विजयासाठी फार कष्ट करण्याची गरज नाही. भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डाही हिमाचल प्रदेशचे. त्यांना स्वतःच्या राज्यात भाजपला विजयी करता आलं नसलं तरी काँग्रेसचे आमदार फोडता येतीलच. पहिला प्रयत्न अपयशी ठरला असला तरी दुसरा प्रयत्न होणार नाही असं नाही. केंद्रीय निवडणूक आयोगाची लोकसभा निवडणुकीची तयारी अंतिम टप्प्यात आलेली आहे. गेल्या दोन दिवसांमध्ये आयोगाने सर्वात मोठे राज्य असलेल्या उत्तर प्रदेशचाही आढावा घेतलेला आहे. त्यामुळं आयोग कोणत्याही क्षणी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करू शकतो. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे दौरे आणि केंद्र सरकारच्या संभाव्य घोषणा यांचा विचार करून आयोग पत्रकार परिषद कधी घ्यायची याचा तारतम्यानं निर्णय करेल. आयोगाने निवडणूक घोषित करण्याआधी भाजपने उमेदवारांची पहिली यादी देखील तयार केलेली आहे. भाजप सशासारखं धावतो. काँग्रेसला बहुधा कोणतीही घाई नसावी.

काँग्रेस कासवाप्रमाणं मंद गतीनं चाललाय. काँग्रेस पक्ष अजून राहुल गांधींच्या 'भारत जोडो न्याय' यात्रेमध्ये अडकून पडलेला दिसतोय. मूळ कार्यक्रमानुसार यात्रा २० मार्चनंतर मुंबईला पोहोचणार होती. या वेगानं यात्रा निघाली तर यात्रेची सांगता होण्याआधीच निवडणूक जाहीर होईल. आचारसंहिता लागू झाल्यानंतर यात्रा काढण्यासाठी आयोगाची परवानगी घ्यावी लागेल. यात्रेच्या खर्चाचा हिशोब द्यावा लागेल. यात्रेच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता असल्याने ही यात्रा १० मार्चपर्यंत मुंबईत येईल असं दिसतंय. म्हणजेच आचारसंहितेआधीच यात्रा संपुष्टात येईल. कासवानं गती थोडी वाढवली असावी.

आधी ठरल्याप्रमाणं यात्रा दररोज ४०-५० किमीचं अंतर पार करणार होती. आता दररोज सुमारे १०० किमीचं अंतर कापलं जातंय. राहुल गांधींची पहिली यात्रा पदयात्रा होती, तिथं दररोज २५-२६ किमी अंतर पार केलं जात होतं. सकाळी साडेसहा ते दहा आणि दुपारी साडेतीन ते सात अशा दोन टप्प्यांमध्ये पदयात्रा होत असे. नव्या यात्रेमध्ये बहुतांश अंतर गाडीतून पार केलं जातंय२६ फेब्रुवारी ते १ मार्च या पाच दिवसांमध्ये राहुल गांधी यांनी केंब्रिजमध्ये व्याख्यान देण्यासाठी सुट्टी घेतली होती. ही यात्रा मध्य प्रदेशात आलेली असून यानंतर ती राजस्थान, गुजरात आणि अखेर महाराष्ट्रात प्रवेश करेल.

## संपादकीय »

### हौस ऑफ बांबू

***कोणाला काही फरक पडत नाही. कुणीही एक्स रे काढून घेत नाही नि लागलीच प्लास्टर वगैरे करत नाही. रस्ता फ्रॅक्चर्ड असल्यानं कुणाच्या भावना दुखावत नाहीत.***

कुणाच्या अस्मितेला धक्का लागत नाही. धर्मनिंदा होत नाही. राष्ट्रद्रोह होत नाही. रिझर्वेशन लागत नाही नि सरकारही बदलत नाही.रस्ता फ्रॅक्चर्ड आहे, पण त्यांचं करायचं काय? आमचे लाडके लेखक श्यामराव मनोहर यांच्या आगामी कादंब्रीची वाट पाहून पाहून माझ्या मनातल्या रस्त्यांना तडे गेले आहेत, हे वाचकांच्या लक्षात आलंच असेल.कोथरुडच्या हाडमोड्या रस्त्यावरुन मी गेल्या आठवड्यात महाराष्ट्र साहित्य परिषदेत गेले होते. 'मसाप' आणि 'पुण्यभूषण फौंडेशन'तर्फे उत्कृष्ट दिवाळी अंकांना पुरस्कार देण्यात आले. कार्यक्रमाला गेले. पाहाते तो काय, पुण्यातले सगळे फ्रॅक्चर्ड रस्ते ओलांडून आमचे डॉ. मोहननाना आगाशे (टोपीसकट) मधोमध हजर!! त्यांच्या बाजूला हुबेहूब श्याम मनोहर बसलेले!! आपल्याला इथं का बोलावलंय, हे न कळल्याचे भाव धारण करुन श्याम मनोहरांनी सभागृहाकडे नजर टाकली.

व्हेनिस बिएनाले'मध्ये यंदा भारताचं 'नॅशनल पॅव्हिलियन' नाही, असं सांगितलं काय किंवा ' व्हेनिस शहरात दर दोन वर्षांनी भरणाऱ्या चित्र/शिल्पकला महाप्रदर्शनाची ६० वी खेप येत्या एप्रिलमध्ये सुरू होईल आणि नोव्हेंबरपर्यंत सुरू राहील, त्यामध्ये भारताचा 'राष्ट्रीय कलामंडपा'द्वारे सहभाग असणार नाही' अशा सविस्तर मराठी शब्दांत सांगितलं.

# व्हेनिस बिएनालेत भारत आणि भारतीय

फार कुणाला कळणारच नाही.. मुळात तिथं भारताचा सहभाग 'सत्तर साल में' कधी म्हणजे कधीही नव्हता! सन २०१४ नंतर जो काही 'नवा भारत' घडला, त्या भारताच्या राष्ट्रीय कलामंडपाचा सहभाग मात्र २०१९ च्या व्हेनिस द्वैवार्षिक महाप्रदर्शनात होता आणि त्या वेळी मात्र 'व्हेनिसमध्ये भारताचा बोलबाला', 'आता दर खेपेला असणार व्हेनिसमध्ये भारताचा राष्ट्रीय कलामंडप' अशा प्रकारची प्रसिद्धी करण्यात आलेली होती. मग करोनामुळे २०२१ सालची व्हेनिस बिएनालेच वर्षभर पुढे ढकलण्यात आली, तेव्हा भारतानं नकार कळवला होता. मात्र ऑक्टोबर २०२३ मध्ये 'इंडिया आर्ट फेअर'च्या संकेतस्थळावर, 'भारत सरकारच्या सांस्कृतिक खात्यातर्फे २०२४ च्या एप्रिलमध्ये होणाऱ्या व्हेनिस बिएनालेमध्ये भारताचा राष्ट्रीय कलामंडप उभारण्यासाठी गुंफणकाराची (प्रदर्शन नियोजकाची) नेमणूक करणे आहे' अशा प्रकारच्या सूचना दिसू लागल्या. त्यामुळे यंदा भारताचं प्रतिनिधित्व करणाऱ्या



तथाकथित स्वायत्त कला-संस्थांनी हात दाखवून अवलक्षण केलंय.. किंवा कुणाच्यातरी नाकर्तेपणामुळे ते त्यांना करावं लागलंय, हे उघड आहे. पण म्हणून काय भारत वंचित राहिलाय का?. त्याबद्दलचा तपशील देण्याआधी थोडं कौतुकही करू या भारतानं एकदाच व्हेनिसमध्ये सिद्ध केलेल्या राष्ट्रीय कलामंडपाचं. ते कौतुक करण्याआधी मुळात, हे व्हेनिसबिनिस एवढं का महत्त्वाचं आणि 'राष्ट्रीय कलामंडप' हा काय प्रकार, हे जरा समजून घेऊ.तर 'जागतिक चित्रशिल्प वगैरे दृश्यकलांचं ऑलिम्पिक' म्हणून व्हेनिसच्या बिएनालेला ओळखलं जातं. व्हेनिसच्या बिएनालेनंतरच जगभर २७० शहरांमध्ये अशी द्वैवार्षिक महाप्रदर्शनं भरू लागली (त्यापैकी काही बंद पडली). सन १८९५ पासून- म्हणजे चित्रकलेच्या इतिहासात 'इम्प्रेशनिझम'मुळे क्रांती घडलेली असतानाच्या काळात – दर दोन वर्षांनी व्हेनिसचं महाप्रदर्शन भरू लागलं, तेव्हा त्याची व्याप्ती युरोपपुरतीच होती. पण या देशांनी यावं, आपापल्या देशातली उच्चकोटीची कला दाखवावी, असा हेतू त्यामागे होता. वसाहतवादी युरोपीय देश त्या वेळी भारतीय उपखंडातून, इंडोचायनातून किंवा आफ्रिकेतून जुन्या कलावस्तू ढापायचे आणि 'हे आमचंच वैभव' म्हणायचे, तसल्या बनवेगिरीला व्हेनिस बिएनालेमध्ये अजिबात स्थान नव्हतं. त्यामुळे झालं असं की इम्प्रेशनिझम, एक्स्प्रेशनिझम, फॉविझम, क्युबिझम, बाउहाउस, फ्यूचरिझम.. अशा कलाविचारांवर आधारलेल्या चळवळी १९०० ते १९४० या काळात युरोपमध्ये मूळ धरत होत्या, तेव्हा त्या नव्या कलेचं प्रतिबिंब व्हेनिसमध्ये दिसायचं. पुढे १९६० च्या दशकातल्या अमेरिकी 'पॉप आर्ट'पर्यंत हे घडत्या इतिहासाचं दर्शन होत राहिलं.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राहुल गांधींचा देश तोडण्याचा डाव!

## समाजात फूट पाडण्याचा त्यांचा डाव : रामदास आठवले

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राहुल गांधी एकीकडे भारत जोडो यात्रा काढत आहेत आणि दुसरीकडे देशाला तोडण्याचा, समाजात फूट पाडण्याचा त्यांचा डाव आहे. काँग्रेस व काही पक्षांनी केंद्रातील भाजप सरकार संविधान बदलणार अशी अफवा पसरवून समाज तोडण्याचेच काम केल्याचा हल्लाबोल केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी केला. सध्या राहुल गांधींनी काँग्रेस पक्ष जोडण्याचेच काम करणे त्यांच्या फायद्याचे असल्याचा परखड सल्लाही आठवले यांनी या वेळी दिला.**



सातार्‍यात ते पत्रकारांशी बोलत होते. 'रिपाइं'चे (आठवले गट) प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते. काँग्रेस पक्षच जोडण्याचे त्यांनी काम करावे रामदास आठवले म्हणाले, लोकसभेच्या निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेस पक्ष सोडून अनेक दिग्गज मंडळी भाजपात जात आहेत. तरी राहुल गांधी यांनी देश जोडण्याऐवजी काँग्रेस पक्षच जोडण्याचे काम करणे त्यांच्या हिताचे ठरेल. राहुल गांधींचा देशभर फिरून काहीही उपयोग होणार नाही, माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते अशोक चव्हाण यांनी नुकताच भाजपात प्रवेश केला. आसामसह अन्य राज्यातील काँग्रेस व अन्य पक्षातील लोकप्रतिनिधी व नेते मोठ्या प्रमाणात भाजपात प्रवेश करीत आहेत. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी देश जोडण्याऐवजी स्वत:चा पक्ष जोडण्याचे काम करण्यात त्यांचा फायदा होणार असल्याचे आठवले म्हणाले.केंद्र सरकारच्या कामगिरीमुळे देश गतीने पुढे जात आहे. परिणामी सध्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (एनडीए) चांगला प्रतिसाद असल्याचा विश्वास देताना, काँग्रेसच्या सत्ताकाळात मात्र, देशाचा विकास गतीने झाला नाही अशी टीका आठवले यांनी केली. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यावर अनेक चांगल्या गोष्टी झाल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जिथे संविधान लिहिले त्या ठिकाणी त्यांचे दीडशे कोटींचे स्मारक उभारण्याचे काम केले. काँग्रेसच्या सत्तेच्या कालावधीत आंबेडकर फाउंडेशन स्थापन झाले. पण, तिथे केवळ एक कार्यालय होते. काँग्रेसला त्यावेळी लक्ष द्यायला वेळच नव्हता. याउलट नरेंद्र मोदी पंतप्रधान होताच त्यांनी साडेतीनशे ते चारशे कोटी रुपये खर्चून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्र उभारले. इंदू मिलच्या जागेवर डॉ. बाबासाहेबांचे स्मारक उभारण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. तिथे डॉ. बाबासाहेबांचा भव्य पुतळा उभारला जात असल्याचे आठवलेंनी सांगितले.राहुल गांधी एकीकडे भारत जोडो यात्रा काढत आहेत आणि दुसरीकडे देशाला तोडण्याचा, समाजात फूट पाडण्याचा त्यांचा डाव आहे. काँग्रेस व काही पक्षांनी केंद्रातील भाजप सरकार संविधान बदलणार अशी अफवा पसरवून समाज तोडण्याचेच काम केल्याचा हल्लाबोल आठवले यांनी केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानातून सर्वांना समान संधीचा अधिकार दिला. अन्य धर्माच्या लोकांनाही समान न्याय देण्याचा अधिकार संविधानात असल्याने ते बदलण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याचा दावा रामदास आठवले यांनी केला. डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्याकडे २६ नोव्हेंबरला संविधानाचा मसुदा सुपूर्द केला. हा दिवस काँग्रेसच्या लक्षात नव्हता, पण नरेंद्र मोदी यांनी हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. संविधान सभेतील सर्वांचेच योगदान आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांचेही योगदान आहे, पण, डॉ. बाबासाहेबांना कमी महत्व देण्याचे काम काँग्रेसने केले. डॉ. बाबासाहेबांचा हा अपमान आम्ही सहन करणार नाही.

### 'एनडीए'ला चांगला प्रतिसाद

» नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यावर अनेक चांगल्या गोष्टी झाल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जिथे संविधान लिहिले त्या ठिकाणी त्यांचे दीडशे कोटींचे स्मारक उभारण्याचे काम केले. काँग्रेसच्या सत्तेच्या कालावधीत आंबेडकर फाउंडेशन स्थापन झाले. पण, तिथे केवळ एक कार्यालय होते. काँग्रेसला त्यावेळी लक्ष द्यायला वेळच नव्हता. याउलट नरेंद्र मोदी पंतप्रधान होताच त्यांनी साडेतीनशे ते चारशे कोटी रुपये खर्चून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्र उभारले. इंदू मिलच्या जागेवर डॉ. बाबासाहेबांचे स्मारक उभारण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. तिथे डॉ. बाबासाहेबांचा भव्य पुतळा उभारला जात असल्याचे आठवलेंनी सांगितले.

# संभाजी महाराज एकही निवडणूक हरले नाहीत

## धन्यवाद देवेंद्रजी.. यापुढेही असं काही झालं तर लक्षात आणून द्या

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तुळापूर या ठिकाणी छत्रपती संभाजी यांच्या समाधी स्थळाचं भूमिपूजन आज करण्यात आलं. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही उपस्थिती होती.**



आपल्या भाषणात अजित पवार यांनी संभाजी महाराजांबाबत एक वक्तव्य केलं. ज्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी ती चूक लक्षात आणून दिली आणि अजित पवार तातडीने सॉरी म्हणाले. "आपले जे आदर्श आहेत, आपले जे महापुरुष होऊन गेले, पुढे इतिहासातमध्ये नवीन पिढीलादेखील त्यांचा इतिहास कळायला हवं. त्यांचं शौर्य काय पद्धतीचं होतं ते समजलं पाहिजे म्हणून आपण या सगळ्या गोष्टींचा विचार करतोय. आज आपण इथे तुळापूरमध्ये स्वराज्यरक्षक संभाजी महाराज यांच्या समाधीस्थळ स्मारकाच्या विकासकामाचं भूमीपूजन होत असताना, आपण सगळ्यांनी संभाजी महाराजांच्या आचारविचारांची जपवणूक करण्यासाठी स्मारक बनवतोय. आपल्या सर्वांना हे स्मारक ऊर्जा देत राहील अशा प्रकारचा विश्वास व्यक्त करतो.तर येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी स्वराज्य रक्षणासाठी प्राणाची आहुती देण्याचा आदर्श निर्माण केला", असं अजित पवार म्हणाले.देवेंद्र फडणवीस यांनी पाठवलेल्या माणसाने अजित पवार यांना त्यांच्या भाषणात त्यांनी संभाजी महाराजांबाबत केलेली चूक सांगितली. ज्यावर अजित पवारांनी स्मितहास्य केलं आणि म्हणाले., "सॉरी, राजकारणामुळे मी निवडणूक म्हटलं पण छत्रपती संभाजी महाराज एकही लढाई हरले नाहीत.

### हे अजित पवार बोलले आणि...

» "मी हे सांगू इच्छितो की दर्जेदार अशा प्रकारचं काम या ठिकाणी झालं पाहिजे. छत्रपती संभाजी महाराज त्यांच्या आयुष्यात एकही निवडणूक हरले नाहीत. अशा प्रकारचा इतिहास आहे. त्यांचं स्मारक आणि वढू-तुळापूरला होतं आहे याचं मला समाधान आहे. तसंच सर्व सहकाऱ्यांना आणि महाराष्ट्रातल्या जनतेला ते स्मारक प्रेरणादायी राहिल.

# घराणेशाहीला निवडणुकीची भीती!

## मोदी यांची बिहारमधील सभेत राजद, काँग्रेसवर टीका

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**घराणेशाहीतून राजकारणात आलेल्यांना आगामी लोकसभा निवडणूक लढवण्याची भीती वाटत असून ते राज्यसभेच्या मार्गाने संसदेत प्रवेश करण्याचा प्रयत्न करत आहेत अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहारमधील औरंगाबादमध्ये बोलताना केली. भ्रष्टाचार, घराणेशाहीचे राजकारण यावर पांघरूण घालण्यासाठी काँग्रेस आणि राजदने दलित आणि इतर वंचित घटकांचा वापर करून घेतला असा आरोप त्यांनी केला.**



मोदी यांनी शनिवारी औरंगाबाद आणि बेगुसराय येथे जाहीर सभांमध्ये राष्ट्रीय जनता दल आणि काँग्रेसला लक्ष्य केले. यावेळी मुख्यमंत्री नितीशकुमार हेही त्यांच्याबरोबर व्यासपीठावर उपस्थित होते.औरंगाबादमधील सभेत काँग्रेस-राजद आघाडीवर टीका करताना मोदी म्हणाले की, “घराणेशाहीने सत्तेवर आलेल्यांना आणि लोकांच्या मनात दहशत बसवणाऱ्यांना रालोआने काठावर ढकलले आहे''. बिहारमध्ये विकास, कायद्याचे राज्य आणि महिलांना भीतीमुक्त जीवन मिळेल याची खबरदारी घेणे ही आपली हमी असल्याचा दावा त्यांनी यावेळी केला. राज्यातील आधीच्या पिढ्या भीतीमध्ये जगत होत्या आणि त्यांनी स्थलांतर करावे लागले. आपण तो काळ पुन्हा येऊ देता कामा नये असे म्हणत त्यांनी राजदवर टीका केली. यावेळी बोलताना मोदी यांनी बिहारमध्ये पुन्हा एकदा दुहेरी-इंजिन सरकार आल्याचा उल्लेख केला. ते पुढे म्हणाले की, बिहार ही देवी सीतेची भूमी असून अयोध्येत राम मंदिर बांधल्यानंतर राज्यातील उत्साह जाणवण्यासारखा होता. माजी मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांना भारतरत्न मिळणे हा संपूर्ण बिहारचा सन्मान असल्याचेही मोदी यांनी सांगितले.बेगुसरायमध्ये बोलताना मोदी यांनी माजी रेल्वेमंत्री लालू प्रसाद यादव आणि त्यांच्या कुटुंबीयांना अडचणीत आणणाऱ्या नोकऱ्यांसाठी जमीन घोटाळ्याचा उल्लेख केला. काँग्रेस आणि राजदने सामाजिक न्यायाचा विश्वासघात केला असा आरोप त्यांनी केला.औरंगाबादमधील सभेत बोलताना मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी आपण यापुढे भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्येच राहणार असल्याचे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिले.“तुम्ही यापूर्वी बिहारमध्ये आला होता त्यावेळी मी काही काळ रालोआमध्ये नव्हतो, आता मात्र रालोआमध्येच राहणार आहे”, असे ते म्हणाले. बेगुसराय : पंतप्रधान मोदी यांनी बेगुसरायमध्ये तेल आणि वायू क्षेत्रातील १.६२ लाख कोटींच्या अनेक प्रकल्पांना सुरुवात केली. हे प्रकल्प बिहार, हरियाणा, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, पंजाब आणि कर्नाटक या राज्यांमध्ये उभारले जाणार आहेत. यावेळी त्यांनी काही रेल्वेसेवांनाही हिरवा झेंडा दाखवला. बिहारमध्ये विकास, कायद्याचे राज्य आणि महिलांना भीतीमुक्त जीवन मिळेल याची खबरदारी घेणे ही आपली हमी असल्याचा दावा त्यांनी यावेळी केला. राज्यातील आधीच्या पिढ्या भीतीमध्ये जगत होत्या आणि त्यांनी स्थलांतर करावे लागले. आपण तो काळ पुन्हा येऊ देता कामा नये असे म्हणत त्यांनी राजदवर टीका केली. यावेळी बोलताना मोदी यांनी बिहारमध्ये पुन्हा एकदा दुहेरी-इंजिन सरकार आल्याचा उल्लेख केला. ते पुढे म्हणाले की, बिहार ही देवी सीतेची भूमी असून अयोध्येत राम मंदिर बांधल्यानंतर राज्यातील उत्साह जाणवण्यासारखा होता. माजी मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांना भारतरत्न मिळणे हा संपूर्ण बिहारचा सन्मान असल्याचेही मोदी यांनी सांगितले.बेगुसरायमध्ये बोलताना मोदी यांनी माजी रेल्वेमंत्री लालू प्रसाद यादव आणि त्यांच्या कुटुंबीयांना अडचणीत आणणाऱ्या नोकऱ्यांसाठी जमीन घोटाळ्याचा उल्लेख केला. काँग्रेस आणि राजदने सामाजिक न्यायाचा विश्वासघात केला असा आरोप त्यांनी केला.औरंगाबादमधील सभेत बोलताना मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी आपण यापुढे भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्येच राहणार असल्याचे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिले. “घराणेशाहीतून राजकारणात आलेल्यांना आगामी लोकसभा निवडणूक लढवण्याची भीती वाटत असून ते राज्यसभेच्या मार्गाने संसदेत प्रवेश करण्याचा प्रयत्न करत आहेत अशी टीका पंतप्रधान मोदी यांनी बिहारमधील औरंगाबादमध्ये बोलताना केली. घालण्यासाठी काँग्रेस आणि राजदने दलित आणि इतर वंचित घटकांचा वापर करून घेतला .

### तो काळ पुन्हा येऊ देता कामा नये

औरंगाबादमधील सभेत बोलताना मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी आपण यापुढे भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्येच राहणार असल्याचे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिले. “तुम्ही यापूर्वी बिहारमध्ये आला होता त्यावेळी मी काही काळ रालोआमध्ये नव्हतो, आता मात्र रालोआमध्येच राहणार आहे”, असे ते म्हणाले. बेगुसराय : पंतप्रधान मोदी यांनी बेगुसरायमध्ये तेल आणि वायू क्षेत्रातील १.६२ लाख कोटींच्या अनेक प्रकल्पांना सुरुवात केली. हे प्रकल्प बिहार, हरियाणा, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, पंजाब आणि कर्नाटक या राज्यांमध्ये उभारले जाणार आहेत. यावेळी त्यांनी काही रेल्वेसेवांनाही हिरवा झेंडा दाखवला. बिहारमध्ये विकास, कायद्याचे राज्य आणि महिलांना भीतीमुक्त जीवन मिळेल याची खबरदारी घेणे ही आपली हमी असल्याचा दावा त्यांनी यावेळी केला. राज्यातील आधीच्या पिढ्या भीतीमध्ये जगत होत्या आणि त्यांनी स्थलांतर करावे लागले. आपण तो काळ पुन्हा येऊ देता कामा नये असे म्हणत त्यांनी राजदवर टीका केली.

# भाजपाची १६ राज्यांमधील १९५ उमेदवारांची यादी जाहीर

## मोदी हे भाजपाचे पहिले उमेदवार; वाराणसीतून निवडणूक लढवतील

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय जनता पार्टीने लोकसभा निवडणुकीसाठी पहिल्या टप्प्यातील उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. भाजपाचे सरचिटणीस विनोद तावडे यांनी पत्रकार परिषद घेऊन १६ राज्यांमधील १९५ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. यामध्ये सर्वाधिक उत्तर प्रदेशमधील ५१ उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भाजपाचे पहिले उमेदवार असून ते त्यांच्या वाराणसी मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवणार आहेत. भाजपाने पहिल्या यादीत २८ महिलांना उमेदवारी दिली आहे.विनोद तावडे यांनी भाजापाच्या उत्तर प्रदेशमधील ५१,पश्चिम बंगालमधील २०, मध्य प्रदेशमधील २४, गुजरातमधील १५, राजस्थानमधील १५, केरळमधील १२, तेलंगणामधील ९, आसाममधील ११, झारखंडमधील ११, छत्तीसगडमधील ११, दिल्लीमधील ५,





जम्मू काश्मीरमधील २, उत्तराखंडमधील ३, अरुणाचल प्रदेशमधील २, गोव्यातील १, त्रिपुरामधील १, अंदमान निकोबारमधील १ आणि दिव-दमणमधील एका उमेदवाराच्या नावाची घोषणा केली. पहिल्या यादीत महाराष्ट्रातील एकाही उमेदवाराचं नाव नाही.पहिल्या यादीत ३४ विद्यमान मंत्र्यांना पुन्हा एकदा उमेदवारी देण्यात आली आहे. केंद्रीय मंत्री किरेन रिजीजू अरुणाचल प्रदेश पश्चिम या मतदारसंघातून निवडणूक लोकसभा निवडणूक लढवतील. तर, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह दुसऱ्यांदा गांधीनगर लोकसभेची जागा लढवणार आहेत.

### 195 उमेदवारांची नावं निश्चित

दरम्यान, यादी जाहीर करण्यापूर्वी विनोद तावडे यांनी सांगितलं की, २९ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय निवडणूक समितीची बैठक पार पडली. या बैठकीत भाजपाच्या पहिल्या १९५ उमेदवारांची नावं निश्चित करण्यात आली आहेत. देशातील १६ राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमधील उमेदवारांची यादी आज (२ मार्च) जाहीर करत आहेत.मनसुख मांडविया पोरबंदरमधून, राजनाथ सिंह लखनौमधून, जितेंद्र सिंह उधमपूरमधून, किरेन रिजिजू अरुणाचल प्रदेश पूर्वमधून, सर्वानंद सोनोवाल आसामच्या डिब्रूगढमधून, संजीव बालियान मुज्जफरनगरमधून लोकसभा निवडणूक लढवतील.

# वीकेंडला 'लापता लेडिज'ची बंपर कमाई!

गोष्ट नुसती उत्तम असून भागत नाही, ती रंजकपणे सांगता यायला हवी. चित्रपटाच्या भाषेत सांगायची तर त्याचा पैस अधिक व्यापक होत जातो. पण म्हणून ती बोजड होणं गरजेचं नाही. तुमच्या आमच्या बाबतीत घडलेली साधीच गोष्टही जेव्हा मनाला स्पर्शून जाते, तुमचं तुम्हाला म्हणून वेगळं काही देऊन जाते तेव्हा तो अनुभव शब्दातीत असतो. किरण राव दिग्दर्शित ‘लापता लेडीज’ हा असाच भन्नाट अनुभव देणारा चित्रपट आहे. एकाच वेळी तो निरागस आहे, शहाणीव देणारा आहे, अलगद प्रेम टिपणारा आहे, समाज-कुटुंब, प्रशासन अशा सगळ्या व्यवस्थेतील उणिवांच्या या फसव्या जगातही सगळंच काही खोटं नाही म्हणून नकळत चेहऱ्यावर समाधान देऊन जाणारा आहे.‘लापता लेडीज’ ही बिप्लब गोस्वामी यांची मूळ कथा खरोखरच भन्नाट आहे. या पुरस्कार विजेत्या कथेला स्वतंत्र प्रतिभेच्या किरण रावसारख्या दिग्दर्शिकेने एक वेगळा दृष्टिकोन देत केलेला हा चित्रपट नितांतसुंदर अनुभव देऊन जातो. एकाच दिवशी लग्नाचे मुहूर्त असल्याने काही नवविवाहित जोडपी एकाच एक्स्प्रेसमधून आपापल्या गावी परतत असतात. लाल साडी आणि डोक्यावरचं भलंमोठं घुंघट ओढून बसलेल्यांपैकी आपली कोणती? हे कळणं अवघडच. तीच गोष्ट एकाच रंगाचे ब्लेझर सूट घालून फिरणाऱ्यांमध्ये आपला कोणता? हे संपूर्ण चेहरा झाकलेल्या पदरातून दिसणार कसं? तर या गोंधळात दीपक कुमार आपल्या नववधूला फुल कुमारीला घेऊन आपल्या गावी परततो आहे. मिळेल ते वाहन, दोन दोन ट्रेन बदलून कराव्या लागणाऱ्या या प्रवासात रात्रीच्या अंधारात आपल्या स्टेशनवर उतरताना दीपक फुलऐवजी दुसऱ्याच कोणाच्या तरी नववधूचा हात पकडून उतरतो. अगदी घरी येऊन ओवाळणीसाठी तिच्या डोक्यावरचा पदर दूर करेपर्यंत या गोंधळाचा पत्ताच कोणाला नसतो. फुल नेमकी कुठे हरवली? तिला शोधायचं कसं? हा दीपकसमोरचा प्रश्न. तर नवऱ्याचं नावही न घेता येणाऱ्या फुलला तिच्या सासरच्या गावाचं नावही आठवत नाही आहे. दीपकचा हात धरून केवळ पायाखालची जमीन धुंडाळत केलेल्या या भल्यामोठ्या प्रवासात आपण कुठून चढलो हेही फुलला माहिती नाही. त्यामुळे तिला घरी पाठवायचं कसं? हा प्रश्न स्टेशन मास्तरला पडला आहे. फुलच्या जागी दीपकच्या घरी पोहोचलेल्या दुसऱ्या लेडीजची कहाणीही रंजक. अखेर हा गोंधळाचा तिढा कसा सुटतो? याची रंजक कथा ‘लापता लेडीज’मध्ये पाहायला मिळते. हरवलेल्या बायकांची ही गोष्ट ऐकून वरकरणी रंजक वाटली तरी काळजाचा ठोका चुकवायला लावणारी आहे. समजून घ्यायला हव्यात अशा, विचार कराव्यात अशा कितीतरी गोष्टी यात आहेत.

# प्रियांकाने केली नव्या सिनेमाची घोषणा



बॉलिवूडसह हॉलिवूड गाजवणारी प्रियांका चोप्रा (PRIYANKA CHOPRA) कधी आपल्या अभिनयाने तर कधी वादग्रस्त वक्तव्याने चर्चेत असते 'देसी गर्ल' प्रियांकाने आता आपल्या आगामी सिनेमाची घोषणा केली आहे. अभिनेत्रीच्या आगामी सिनेमाची चाहते आतुरतेने वाट पाहत होते. आता अभिनेत्रीने घोषणा आपल्या आगामी सिनेमाची घोषणा केली असून तिचे काही चाहते मात्र नाराज झाले आहेत. प्रियांकाचा आगामी सिनेमा हा बॉलिवूडट नसून हॉलिवूडपट आहे. प्रियांका चोप्राने सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या आगामी सिनेमाची घोषणा केली आहे. एका बातमीचा स्क्रीनशॉट शेअर करत तिने लिहिलं आहे,"मला आशा होती की जर मी जिवंत राहिले आणि देवाची इच्छा असेल तर आपल्याला देखील समुद्री डाकू बनण्याची संधी मिळेल".'द ब्लफ'चं कथानक 19 व्या शतकातील कॅरेबियन फेजवर आधारित आहे. एका माजी महिला समुद्री डाकूची गोष्ट या सिनेमात दाखवण्यात आली आहे. कुटुंबियांची रक्षा करण्यासाठी धडपडणारं प्रियांकाचं पात्र आहे. अत्यंत रहस्यमय असा हा सिनेमा आहे. फ्रँक ई फ्लावर्स या सिनेमाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळणार आहे. फ्रँक ई 'BOB : MARLEY: ONE LOVE' या सिनेमामुळे चर्चेत आला होता.

# राम चरणवर नेटकऱ्यांकडून कौतुकाचा वर्षाव

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार राम चरण (RAM CHARAN) हा त्याच्या चित्रपटांमुळे आणि वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असतो. काही महिन्यांपूर्वी राम चरणची पत्नी उपासनानं (UPASANA) मुलीला जन्म दिला. राम चरण आणि उपासना यांना अनेकवेळ एकत्र स्पॉट केलं जातं. आता उपासना आणि राम यांचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. या व्हिडीओवर कमेंट करुन अनेकजण राम चरणचं कौतुक करत आहेत.राम चरण आणि उपासना हे अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या प्री-वेडिंग फंक्शनससाठी फ्लाइटमधून जामनगरला जात होते. फ्लाइटमधील राम चरण आणि उपासना यांचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये दिसत आहे की, राम चरण हा पत्नी उपासनाच्या पायाची मालिश करत आहे.राम चरण आणि उपासना यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. या व्हिडीओला एका नेटकऱ्यानं कमेंट केली, "कपल गोल्स" तर दुसऱ्यानं या व्हिडीओला कमेंट केली, "नवरा असावा तर असा"राम चरण आणि उपासना हे बालपणीचे मित्र-मैत्रीण आहेत. दोघांच्या मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले. त्यानंतर 2012 मध्ये राम चरण आणि उपासना यांनी लग्नगाठ बांधली.2023 मध्ये उपासनानं मुलीला जन्म दिला. राम चरण आणि उपासना यांनी त्यांच्या मुलीचं नाव क्लिन कारा असं ठेवलं आहे.



# अनंत अंबानींच्या प्री-वेडिंगमध्ये गाण्यासाठी 52 कोटी

गुजरातमधील जामनगर येथे सध्या अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांचे प्री-वेडिंग फंक्शन्स सुरु आहेत. 1 मार्चपासून सुरू झालेले हे प्री-वेडिंग फंक्शन्स 3 मार्चपर्यंत चालणार आहे. काल (2 मार्च) हॉलिवूड पॉप सिंगर रिहानाने (RIHANNA) अनंत आणि राधिका यांच्या प्री-वेडिंग फंक्शन्समध्ये परफॉर्म केलं. यावेळी स्टेजवर परफॉर्म करताना रिहाना OOPS MOMENT ची शिकार झाली. नुकताच रिहानाचा एक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या फोटोमध्ये रिहानाचा ड्रेस फाटलेला दिसत आहे.रिहानानं अनंत आणि राधिका यांच्या प्री-वेडिंग फंक्शनमध्ये 'वाइल्ड थिंग्स', 'पोर टी अप' आणि 'डायमंड्स' या गाण्यावर परफॉर्म केलं. रिहानाच्या परफॉर्मन्सचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. अशताच इव्हेंटमध्ये परफॉर्म करताना रिहानाचा ड्रेस फाटला. रिहाना स्टेजवर परफॉर्म करत होती तेव्हा तिच्या ड्रेसची शिलाई उसवली. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटोमध्ये रिहानाचा ड्रेस फाटलेला दिसत आहे.काही दिवसांपूर्वी इंस्टंट बॉलिवूड नावाच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन एक पोस्ट शेअर करण्यात आली होती. त्यानुसार रिहानानं अनंत आणि राधिकाच्या प्री वेडिंगसाठी तब्बल 52 कोटी रुपयांचे मानधन घेतले आहे.अनंत अंबानी आणि राधिका यांच्या प्री-वेडिंग परफॉर्मन्सदरम्यान रिहाना म्हणाली, "आज इथे परफॉर्म करणे माझ्यासाठी खास आहे. याआधी मी कधीच भारतात आले नव्हते. अंबानी कुटुंबाचे आभार, त्यांच्यामुळे मी आज येथे आहे. अनंत आणि राधिका, मला इथे बोलवल्याबद्दल धन्यवाद. देव तुम्हाला आशीर्वाद देवो. मी तुम्हाला शुभेच्छा देतो. अभिनंदन."अनंत अंबानी आणि राधिका यांच्या प्री-वेडिंग फंक्शनला दीपिका पादुकोण, रणवीर सिंह, सैफ अली खान, जान्हवी कपूर, अजय देवगण, शाहरुख खान, आलिया भट्ट, करीना कपूर यांनी हजेरी लावली. गुजरातमधील जामनगर येथे सध्या अनंत अंबानी ) आणि राधिका मर्चंट यांचे प्री-वेडिंग फंक्शन्स सुरु आहेत. 1 मार्चपासून सुरू झालेले हे प्री-वेडिंग फंक्शन्स 3 मार्चपर्यंत चालणार आहे.

# एमपीने विदर्भाला 170 धावांत गुंडाळले

## » आवेश खानने विदर्भाविरुद्ध पहिल्या डावात 4 विकेट्स घेतल्या

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**रणजी ट्रॉफी हंगाम २०२४ चा पहिला उपांत्य सामना विदर्भ आणि मध्य प्रदेश यांच्यात खेळला जात आहे, तर दुसरा उपांत्य सामना मुंबई आणि तामिळनाडू यांच्यात खेळवला जात आहे. पहिल्या उपांत्य सामन्यात मध्य प्रदेशने विदर्भाला पहिल्या डावात अवघ्या १७० धावांत गुंडाळले. दुसऱ्या उपांत्य सामन्यात अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखाली मुंबईविरुद्ध तामिळनाडूची फलंदाजी पहिल्या डावात सपशेल अपयशी ठरली. संपूर्ण संघ १४६ धावांवर गारद झाला.**





मुंबईविरुद्धच्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात तामिळनाडूने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. हा निर्णय तामिळनाडूच्या फलंदाज योग्य ठरवण्यात अपयशी ठरले. कारण या संघाचे फलंदाज मुंबईच्या घातक गोलंदाजीसमोर शरणागती पत्करताना दिसले.तामिळनाडूकडून विजय शंकरने सर्वाधिक ४४ धावा केल्या, तर वॉशिंग्टन सुंदरने ४३ धावांची खेळी केली. पहिल्या डावात साई किशोरने केवळ एका धावेची खेळी केली, तर मुंबईकडून तुषार देशपांडेने पहिल्या डावात सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या, तर शार्दुल ठाकूर, मुशीर खान आणि तनुष कोटियन यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. तसेच मोहित अवस्थीला एक विकेट मिळाली. तामिळनाडूच्या १४६ धावांच्या प्रत्युत्तरात मुंबई संघ पहिला दिवस अखेर १०१ धावांनी पिछाडीवर आहे. मुंबई संघाने १७ षटकानंतर २ बाद ४५ धावा केल्या आहेत. पृथ्वी शॉ (५) आणि भूपेन ललवाणी (१५) बाद झाले आहेत. सध्या मुशीर खान (२४) मोहित अवस्थी (१) नाबाद आहेत. तामिळनाडूकडून कुलदीप सेन आणि साई किशोरने प्रत्येकी एक विकेट घेतली.या मोसमातील पहिल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात विदर्भाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु संघाला केवळ १७० धावापर्यंतच मजल मारता आली. विदर्भासाठी करुण नायरने सर्वाधिक ६३ धावांची खेळी साकारली, तर अथर्व तायडेने ३९ धावांचे योगदान दिले, तर ध्रुव शौरेने या महत्त्वाच्या सामन्यात १३ धावांची खेळी केली.मध्य प्रदेशकडून आवेश खानने अप्रतिम गोलंदाजी करताना सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या. तसेच कुलवंत खजरोलिया आणि व्यंकटेश अय्यर यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. विदर्भाच्या १७० धावांच्या प्रत्युत्तरात मध्यप्रदेश संघ पहिला दिवस अखेर १२३ धावांनी पिछाडीवर आहे. मध्यप्रदेश पहिल्या डावात पहिला दिवस अखेर २० षकानंतर १ बाद ४७ धावा केल्या आहेत. यश दुबे ११ धावांचे योगदान देऊन पहिल्या विकेट्सच्या रुपाने बाद झाला. त्याला उमेश यादवने अक्षय वाडकरच्या हाती झेलबाद केले.मुंबईविरुद्धच्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात तामिळनाडूने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. हा निर्णय तामिळनाडूच्या फलंदाज योग्य ठरवण्यात अपयशी ठरले. कारण या संघाचे फलंदाज मुंबईच्या घातक गोलंदाजीसमोर शरणागती पत्करताना दिसले.तामिळनाडूकडून विजय शंकरने सर्वाधिक ४४ धावा केल्या, तर वॉशिंग्टन सुंदरने ४३ धावांची खेळी केली. पहिल्या डावात साई किशोरने केवळ एका धावेची खेळी केली, तर मुंबईकडून तुषार देशपांडेने पहिल्या डावात सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या.

### मध्यप्रदेश 123 धावांनी पिछाडीवर

» तर शार्दुल ठाकूर, मुशीर खान आणि तनुष कोटियन यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. तसेच मोहित अवस्थीला एक विकेट मिळाली.तामिळनाडूच्या १४६ धावांच्या प्रत्युत्तरात मुंबई संघ पहिला दिवस अखेर १०१ धावांनी पिछाडीवर आहे. मुंबई संघाने १७ षटकानंतर २ बाद ४५ धावा केल्या आहेत. पृथ्वी शॉ (५) आणि भूपेन ललवाणी (१५) बाद झाले आहेत. सध्या मुशीर खान (२४) मोहित अवस्थी (१) नाबाद आहेत. तामिळनाडूकडून कुलदीप सेन आणि साई किशोरने प्रत्येकी एक विकेट घेतली.या मोसमातील पहिल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात विदर्भाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु संघाला केवळ १७० धावापर्यंतच मजल मारता आली. विदर्भासाठी करुण नायरने सर्वाधिक ६३ धावांची खेळी साकारली, तर अथर्व तायडेने ३९ धावांचे योगदान दिले, तर ध्रुव शौरेने या महत्त्वाच्या सामन्यात १३ धावांची खेळी केली.मध्य प्रदेशकडून आवेश खानने अप्रतिम गोलंदाजी करताना सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या. तसेच कुलवंत खजरोलिया आणि व्यंकटेश अय्यर यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. विदर्भाच्या १७० धावांच्या प्रत्युत्तरात मध्यप्रदेश संघ पहिला दिवस अखेर १२३ धावांनी पिछाडीवर आहे. मध्यप्रदेश पहिल्या डावात पहिला दिवस अखेर २० षकानंतर १ बाद ४७ धावा केल्या आहेत.

# ध्रुव जुरेल इंग्रजांविरुद्ध लढून 'तारा' झाला!

## » इशान किशनने कसोटी मालिका खेळण्यास दिला नकार?

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (BCCI) नुकताच वार्षिक करार जाहीर करण्यात आला. यामध्ये श्रेयस अय्यर आणि इशान किशन या दोन प्रमुख खेळाडूंना स्थान मिळालेलं नाही. त्यामुळे ते सातत्याने चर्चेत आहेत. अलीकडील काळात टीम इंडियासाठी सातत्यपूर्ण क्रिकेट खेळूनही, दोन्ही खेळाडूंना बीसीसीआयच्या करारातून मुक्त करण्यात आले आहे. देशांतर्गत क्रिकेटमध्ये भाग न घेण्यामुळे बीसीसीआयने त्यांना दणका दिला आहे.**

ईएसपीएन क्रिकइन्फोने दिलेल्या वृत्तानुसार भारत आणि इंग्लंड कसोटी मालिकेदरम्यान भारतीय क्रिकेट संघ व्यवस्थापनाने इशान किशनशी संपर्क साधला होता. किशनने तो अजून तयार नसल्याचे सांगत ऑफर नाकारली होती. अशा परिस्थितीत त्याच्या जागी युवा ध्रुव जुरेलला संधी मिळाली आणि किशनच्या अनुपस्थितीत त्याला सामनावीराचा पुरस्कारही मिळाला. ध्रुव जुरेलच्या दोन्ही डावातील खेळी टीम इंडियाच्या चौथ्या कसोटीतील किंग मेकर ठरल्या.बीसीसीआयने इशान किशन आणि श्रेयस अय्यरला वगळण्याचे कोणतेही अधिकृत कारण दिलेले नाही. मात्र, मंडळाने याबाबत निश्चितच इशारा दिला. बीसीसीआयने









म्हटले आहे की, 'सर्व खेळाडूंनी राष्ट्रीय संघाचे प्रतिनिधित्व करत नसल्यास देशांतर्गत क्रिकेटमध्ये सहभाग घेण्यास प्राधान्य द्यावे.' 17 डिसेंबरला इशान किशनने दक्षिण आफ्रिका दौऱ्यातून माघार घेतली होती. त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून ब्रेक घेतला. मात्र, इशान किशन या वेळेचा वापर राष्ट्रीय संघापासून दूर देशांतर्गत क्रिकेट खेळण्यासाठी करेल, अशी अपेक्षा होती. पण त्याने आपल्या राज्य संघ झारखंडच्या रणजी सामन्यांमध्ये भाग न घेण्याचा निर्णय घेतला. भारतीय क्रिकेट संघाचे प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी स्पष्ट सूचना दिल्या होत्या की, इशानला संघात परतण्यासाठी क्रिकेट खेळण्याची गरज आहे. मात्र त्याकडे दुर्लक्ष केले. त्याचप्रमाणे श्रेयस अय्यरलाही दुखापतीमुळे मुंबईच्या रणजी सामन्यात सहभागी होता आले नाही. मात्र इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तानुसार, त्याच्या दुखापतीबाबत राष्ट्रीय क्रिकेट अकादमीच्या अहवालाने हा दावा फेटाळून लावला आहे.

### देशांतर्गत क्रिकेटमध्ये प्राधान्य द्यावे

» ईएसपीएन क्रिकइन्फोने दिलेल्या वृत्तानुसार भारत आणि इंग्लंड कसोटी मालिकेदरम्यान भारतीय क्रिकेट संघ व्यवस्थापनाने इशान किशनशी संपर्क साधला होता. किशनने तो अजून तयार नसल्याचे सांगत ऑफर नाकारली होती. अशा परिस्थितीत त्याच्या जागी युवा ध्रुव जुरेलला संधी मिळाली आणि किशनच्या अनुपस्थितीत त्याला सामनावीराचा पुरस्कारही मिळाला. ध्रुव जुरेलच्या दोन्ही डावातील खेळी टीम इंडियाच्या चौथ्या कसोटीतील किंग मेकर ठरल्या.बीसीसीआयने इशान किशन आणि श्रेयस अय्यरला वगळण्याचे कोणतेही अधिकृत कारण दिलेले नाही. मात्र, मंडळाने याबाबत निश्चितच इशारा दिला. बीसीसीआयने म्हटले आहे की,'सर्व खेळाडूंनी राष्ट्रीय संघाचे प्रतिनिधित्व करत नसल्यास देशांतर्गत क्रिकेटमध्ये सहभाग घेण्यास प्राधान्य द्यावे.